# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.
## दिनांक १४.०९.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—** मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १३/०९/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १५६ वाहन चालकाविरूध्दकार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन १,१४,१५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री कर अंतर्गत दिनांक १३/०९/२०२२ रोजी दारूबंदी कायद्या अंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन कुरूंदा व पोस्टे हटटा येथे प्रत्येकी ०१ अशा एकुण ०२ ठिकणी छापा मारून कार्यवाही करून आरोपीतांकडुन ५.९४ लिटर दारू असा एकुण २,५७०/—रू कि.अं ची अवैध दारूचा साठा जप्त करण्यात आला असुनआरोपीतांविरूध्द दारूबंदी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जिल्हा पोलीस दलातर्फे महिला विषयक जनजागृतीपर जननी सुरक्षा कार्यक्रम :—** मा.पोलीस अधीक्षक हिंगोली श्री.एम.राकेश कलासागर यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात पोलीस दलाकडुन महिला व बालकां संबंधि होणारे अन्याय व अत्याचार थांबलेपाहिजेत .महिलां व बालकांना त्यांच्या सुरक्षे संबंधि कायदे व नियम यांचे माहिती होवुन त्यांच्यातजनजागृती व्हावी या व्यापक हेतुने जननी हा कार्यक्रम संपुर्ण जिल्हयात राबविण्यात येत आहे.